E-8499792

मंगळवार, दिनांक ०३ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीच्या कार्यवृत्तातील आपल्या विभागाशी संबंधित निर्णयाचा उतारा :-

गुप्त

D.S. (Walke)

मुख्य सचिवांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जून, २०२५.

शासनाचे अपर मुख्य सचिव (जलसंपदा) / अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) / अपर मुख्य सचिव (महसूल) / अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) / अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) / सचिव (आदिवासी विकास) यांना महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १५ अन्वये देण्यात आलेल्या शासनाच्या कामकाजासंबंधी अनुदेशामधील अनुदेश २७ (३) अन्वये योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

विभागाने सदर निर्णयाची **अंमलबजावणी तातडीने** करावी व तत्संबंधीची माहिती मंत्रिमंडळास देण्याकरिता विहित केलेल्या प्रपत्रात ई-समिक्षा प्रणालीवर सादर करावी. यामध्ये कोणतीही अडचण असल्यास प्रकरण शासनास त्वरित फेरसादर करावे.

(सही)

मंत्रिमंडळ सचिव

प्रत (संपूर्ण कार्यवृत्ताच्या प्रतीसह) :-

१) अपर मुख्य सचिव (वित्त)
२) अपर मुख्य सचिव (नियोजन)

---

अवर सचिव (कार्यासन-9) कार्यवाहीसाठी

(सही) १३/६/२५

GR त्वरित साईट करावा

मंत्रिमंडळ बैठकीचा दिनांक : ०३.०६.२०२५

विषय क्रमांक ७ : **मा. मंत्रिमंडळाच्या दि. १४.१०.२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाअंतर्गत मुंबई प्रवेश व्दाराच्या पाच पथकर स्थानकावर हलकी वाहने, स्कुल बसेस व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस यांना दि. १४.१०.२०२४ पासून पथकरातून सूट दिल्यामुळे महामंडळास द्यावी लागणारी भरपाई निश्चित करण्याबाबत.**

या विषयावरील विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

१) सदर प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत मुंबई प्रवेश द्वाराच्या पाच पथकर स्थानकावर हलकी वाहने, स्कुल बसेस व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस यांना पथकारातून सुट दिल्यामुळे झालेल्या नुकसान भरपाई याकरीता मर्यादित राहील यास मान्यता देण्यात यावी.

२) सदर पाच पथकर स्थानकावर हलकी वाहने, स्कूल बसेस, म.रा.मा.प. महामंडळाच्या बसेस यांना सूट दिल्यामुळे मे.एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या उद्योजकास प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीस अधिन राहून नुकसान भरपाई देण्याकरीता मा.मुख्य सचिव समितीने शिफारस केल्यानुसार मूळ सवलत कालावधी दि. १९.११.२०१० ते दि.१८.११.२०२६ मध्ये सुधारणा करुन सदर सवलत कालावधी दि.१९.११.२०२६ ते दि.१७.०९.२०२९ पर्यंत वाढवून देण्यास मान्यता देण्यात यावी.

३) सदर पाच पथकर स्थानकावर हलकी वाहने, स्कूल बसेस, म.रा.मा.प. महामंडळाच्या बसेस यांना सूट दिल्यामुळे महामंडळाचा संपुष्टात येणारा मूळ सवलत कालावधी दि. ३०.०९.२०२७ मध्ये सुधारणा करुन सदर सवलत कालावधी दि. १७.०९.२०२९ पर्यंत वाढवून देण्यास मान्यता देण्यात यावी.

४) सदर वाढीव सवलत कालावधीत उद्योजकामार्फत सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे देखभाल व दुरुस्तीचे कामे करणे अनिवार्य राहिल यास मान्यता देण्यात यावी.

५) पथकर वसुलीकरीता १००% फास्ट टॅग/जी.पी.एस. व इतर अद्यावत पथकर वसुली प्रणालीच्या आधारे सदर वाढीव सवलत कालावधी दि.१९.११.२०२६ ते दि. १७.०९.२०२९ मध्ये उद्योजकाने महामंडळास व महामंडळाने शासनास सर्व प्रकारच्या वाहनांची प्रत्यक्ष वाहनगणना Real Time Data उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील यास मान्यता देण्यात यावी.

६) स्कूल बसेस व म.रा.मा.प. महामंडळाच्या बसेसची प्रत्यक्ष वाहन गणना Real Time Data नुसार उपलब्ध होणाऱ्या गणनेनुसार देणे आवश्यक आहे. त्यामुळे स्कूल बसेस यांना पथकरातून सूट दिल्यामुळे द्यावयाची नुकसान भरपाई सदर वाहनाच्या प्रत्यक्ष वाहतूक गणनेनुसार व म.रा.मा.प. महामंडळाच्या बसेस यांना पथकरातून सूट दिल्यामुळे द्यावयाची नुकसान भरपाई म.रा.मा.प. महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या वाहतूक गणनेनुसार रोख स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात यावी.

७) महामंडळास वाशी खाडी पूल येथील स्थित पथकर स्थानकावर दि.३०.०९.२०३६ पर्यंत सवलत कालावधी देण्यात आला आहे. महामंडळाने सवलत कालावधीमध्ये होणाऱ्या नुकसान भरपाईकरीता रक्कम रु.२७९८.२८ कोटी एवढया रक्कमेची नुकसान भरपाई मिळण्याबाबत विनंती केली आहे. ठाणे खाडी पूल क्र.३ या प्रकल्पाची अंदाजित किंमत रक्कम रु.७७५.५८ कोटी इतकी आहे. महामंडळाने कळविल्याप्रमाणे सदर प्रकल्पावरील अद्यापपर्यंतचा प्रत्यक्ष खर्च रु.८१४.३२ कोटी इतका आहे. महामंडळास सवलत कालावधीची नुकसान भरपाई देण्याऐवजी प्रकल्पावरील अद्यापपर्यंतची खर्चाची रक्कम महामंडळास रोख स्वरुपात टप्प्या-टप्याने देण्यास मान्यता देण्यात यावी.

कार्यवाही : अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम)

( विठ्ठल भास्कर )
उप सचिव
मुख्य सचिव कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२